शुश्रूषा संवर्गातील बंधपत्रीत अधिपरिचारीकांची विशेष लेखा परिक्षा घेण्याबाबत तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये शासकीय परिचारीका प्रशिक्षण महाविद्यालयामधील बंधपत्र बंद करणेबाबत

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
### शासन निर्णय क्रमांकः सेप्रनि २०१९/ प्र. क्र. ११८/ सेवा ५

१०वा मजला, बी विंग, गो. ते. रुग्णालय संकूल इमारत,
नविन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई ४०० ००१.
तारीख: २८ जुन,२०१९

वाचा -

**अधिसुचना क्रमांकः सेप्रनि-२०१४/अधिप/प्र.क्र.९५/सेवा-५, दि.१५.०४.२०१५**

प्रस्तावना -

अधिपरिचारीका सवंर्गासाठी सन १९६४ साली सेवा प्रवेश नियम अधिसूचित करण्यात आले होते. या अधिसूचिनेनुसार किंवा तत्पुर्वी सर्जन जनरल च्या कालावधीपासून बंधपत्रीत अधिपरिचारीकांना बंधपत्र कालावधी पूर्ण झाल्यानंतर सेवेत कायम केले जात होते. तथापि, शासन परिपत्रक साप्रवि दिनांक २५.०८.२००५ मध्ये नमूद केल्यानुसार मा. सर्वोच्य न्यायालयाने तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या अथवा शासन सेवेत येऊन सेवा नियमित करण्यासाठी विहीत पध्दतीने शासन सेवेत प्रविष्ठ होणे आवश्यक असणे बंधनकारक केल्यामुळे बंधपत्रीत अधिपरिचारीकांच्या सेवा नियमित करण्यास अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यावेळी अधिपरिचारीका संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमामध्ये दिनांक १५.०४.२०१५ च्या अधिसूचनेनुसार बदल करण्यात येऊन सुधारित सेवा प्रवेश नियम अस्तित्वात आले.

दिनांक १५.०४.२०१५ रोजी अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमातील नियम १३ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

" वरीलप्रमाणे काहीही अंतर्भूत असले तरी दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पर्यंत बंधपत्रानुसार अधिपरिचारीका या पदावर बंधपत्रीत म्हणून शासन सेवेत नियुक्त झालेल्या व सेवा नियमित न झालेल्या अधिपरिचारीकांना त्यांच्या सेवा नियमित होण्यासाठी महाराष्ट्र ज्ञान महामंडळामार्फत अथवा शासन निश्चित करेल अशा प्राधिकृत संस्थेमार्फत आयोजित केलेली विशेष लेखी परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

१. एका संधीत लेखी परिक्षा उत्तीर्ण न होणाऱ्या बंधपत्रीत अधिपरिचारीकांना लेखी परिक्षेसाठी दुसरी संधी देण्यात येईल.
२. दुसऱ्या संधीत लेखी परिक्षा उत्तीर्ण होऊ शकणार नाहीत त्यांना लेखी परिक्षेला बसण्याची एक शेवटची संधी देण्यात येईल.
३. उप नियम (ब) मधील तरतूदीनुसार शेवटच्या संधीत लेखी परिक्षा उत्तीर्ण होणार नाहीत त्यांच्या सेवा तात्काळ समाप्त करण्यात येतील. परंतु असे की, विहीत संधीत परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या बंधपत्रीत अधिपरिचारीकांच्या सेवा हे नियम प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून नियमित समजण्यात येतील.

उपरोक्त अधिसूचनेनुसार दिनांक ३१.१२.२०११ पर्यंतच्या अधिपरिचारीकांना विशेष लेखा परिक्षेसाठी पात्र समजण्यात आले. तथापि, दिनांक ०१.०१.२०१२ ते दिनांक १५.०४.२०१५ या कालावधीत शासन सेवेत

असलेल्या बंधपत्रीत अधिपरिचारीका हया विशेष लेखी परिक्षेसाठी पात्र न ठरल्याने त्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत अनेक न्यायालयीन प्रकरणे झालेली आहेत. यावर सर्वकष विचार करुन सेवा प्रवेश नियम अधिसूचित झालेल्या दिनांकापासूनच्या म्हणजेच दिनांक १५.०४.२०१५ पर्यंत शासन सेवेत कार्यरत असलेल्या बंधपत्रीत अधिपरिचारीकांना विशेष लेखा परिक्षेसाठी पात्र ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे

## शासन निर्णय-

१. दिनांक १५.०४.२०१५ पर्यत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य सेवा संचालनालय व राज्य कामगार विमा योजना यांचे अधिपत्याखाली कार्यरत बंधपत्रीत अधिपरिचारीकांना विशेष लेखा परिक्षेसाठी पात्र समजण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. दिनांक १५.०४.२०१५ नंतर मात्र सर्व अधिपरिचारीकांच्या नियुक्त्या हया नामनिर्देशनाने करण्यात येतील.

२. या अनुषंगाने यथावकाश सेवा प्रवेश नियमात सुधारणा करुन अधिसूचित करण्याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

३. याचबरोबर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून शासकीय परिचारिका महाविद्यालयात प्रशिक्षण घेणाऱ्या व उत्तीर्ण होणाऱ्या परिचारिकांकडून बंधपत्र घेण्याचे बंद करण्यात येत आहे.

४. सद्यस्थितीत बंधपत्रीत म्हणून कार्यरत असलेल्या (शैक्षणिक वर्ष २०१९ पर्यंत) अधिपरिचारीकांची स्वतंत्रपणे परिमंडळनिहाय जेष्ठता यादी तयार करण्यात यावी व सेवा जेष्ठतेनुसार चक्राकार पध्दतीने (Rotation) त्यांना रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरुपात ( ६ महिन्याच्या कालावधीपर्यत) नियुक्ती देण्यात यावी.

सदर शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील आरोग्य सेवा संचालनालय व राज्य कामगार विमा योजना यांचे अधिपत्याखाली सर्व बंधपत्रीत अधिपरिचारीका संवर्गासाठी लागू करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६२८१२४३१४९४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KIRAN VASANTRAO WAHUL

Digitally signed by KIRAN VASANTRAO WAHUL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=58e32592d7ee16b3f0ea3e5db304272db056899514ece7f762990f9b1a0c5049, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=2e35734ec976bf5657815fb42c4d25b0b3c23b4c69600638f3deb172ac9e37f4, ou=PHD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN VASANTRAO WAHUL
Date: 2019.06.28 15:02:15 +05'30'

श्री.कि.व.वाहुल
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रज्ञलय, मुंबई

२. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

३. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुबई

४. आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
५. सर्व विभागीय आयुक्त
६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
७. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
८. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा (सर्व)
९. सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
१०. उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व)
११. जिल्हा शल्यचिकित्सक (सर्व)
१२. जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व)
१३. महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
१४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१५. मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१६. मा. मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१७. मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव
१८. सर्व सह सचिव/उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
१९. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे स्विय सहायक
२०. सर्व कार्यासन अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. निवड नस्ती-सेवा-५